# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२
**(सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)**

**सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (तिसरा व शेवटचा दिवस).**

**(दुपारी १२-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) ऊर्जा मंत्री** : "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) नगरविकास मंत्री** : "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** :

**(क)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

अप्राधिकृत प्रत

**तीन : "विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल क्रमांक २०५ सभागृहास सादर करणे."**

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) (मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) —[अनुक्रमांक (१) ते (५)] —**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६** वर **उद्योग मंत्री** निवेदन करतील:-

"डोंबिवली एमआयडीसी मधील कारखान्यांतून होणाऱ्या प्रदुषणामुळे डोंबिवली परिसरात आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असणे, रायगड मधील पातळगंगा येथे सदर कारखान्यांचे स्थलांतर करण्याचा निर्णय एमआयडीसीने घेतलेला असणे."

(२) **सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर,** प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ४** वर **गृह मंत्री** निवेदन करतील:-

"ठाण्यातील घोडबंदर रोडवर आनंदनगर येथे अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या एका नायजेरियन व्यक्तिला अटक केली असणे, या व्यक्तिकडून आफ्रिकेतून अंमली पदार्थ आणून मुंबई, ठाणे व नवी मुंबई येथे त्यांचा व्यापार, तस्करी, चोरीचा माल विकणे."

(३) **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील:-

"राज्यात खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काला आळा घालण्यासाठी शिक्षण सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली शुल्क सुधारणा समितीची स्थापना करण्यात येणे, या समितीच्या अहवालात खाजगी शाळांतील शुल्क फेरनिश्चितीचे धोरण ठरविले नसल्याबाबत."

(४) **सर्वश्री प्रसाद लाड,** प्रविण दरेकर, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ७** वर **नगरविकास मंत्री** निवेदन करतील:-

अग्रिम प्रत

"कोट्यवधींचा व्यवसाय करणाऱ्या सुमारे २०० थकबाकीदारांकडून मुंबई महानगरपालिकेची २२९४ कोटी मालमत्ता कराची थकबाकी उघडकीस येणे, दहा वर्षांपासून कर न भरणाऱ्या २०० जणांमध्ये बिल्डर, मल्टीनॅशनल व कॉर्पोरेट कंपन्यांचा समावेश असणे, शासनाने महापालिकेला कारवाई करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता."

(५) **ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५** वर **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** निवेदन करतील:-

"राज्यातील स्पर्धा परिक्षा तयारी करण्याकरिता विद्यार्थी दिल्ली सारख्या शहरांमध्ये जाणे, पदवी स्तरावर स्पर्धा परिक्षासारखे अभ्यासक्रम उपलब्ध नसल्याने राज्यातील सर्व विद्यापिठांमध्ये बॅचलर ऑफ सिव्हील सर्विसेस अभ्यासक्रम सुरू करण्याची आवश्यकता."

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **(बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ व मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) —[अनुक्रमांक (१)] —**

**श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी उजनी ते सोलापूर १०५ कि.मी. अंतराच्या समांतर जलवाहिनीचे काम केंद्र शासन व राज्य शासन यांच्या निधीतून गेल्या तीन वर्षांपासून सुरु असणे, जलवाहिनीची निविदा निघाल्यानंतर सहा महिन्यात राज्य शासनाने जलवाहिनी मार्गातील प्रशासकीय बाबींची पूर्तता करुन कंपनीला जागा ताब्यात देणे अपेक्षित असणे, जॅकवेल आणि पाईपलाईनची जागा स्मार्ट सिटीच्या ताब्यात देण्यासाठी स्मार्ट सिटीकडून राज्य शासनास वारंवार पत्रव्यवहार करुनही आजतागायत उजनी जॅकवेलसाठी रितसर जागा ताब्यात न मिळणे, राष्ट्रीय राजमार्गाच्या जागेतून जलवाहिनी टाकण्याचा निर्णय होऊन त्यासाठी राजमार्ग प्राधिकरणाने मागितलेले ४२ कोटी व उर्वरित भूसंपादनासाठी येणारा खर्च ६ कोटी असे एकूण ४८ कोटी रुपये नगरविकास खात्याने द्यावेत अशी महापालिका प्रशासनाची मागणी असणे, नगरविकास खात्याने सदर निधी देण्यास नकार देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांनी हा निधी उभारावा असे कळवणे, एकूणच

अग्रिम प्रत

नुकसान भरपाई निश्चितीकरण, भूसंपादनासाठी शासनाकडे निधीची मागणी, उजनी येथील जलसंपदा विभागाची जागा हस्तांतर, यात होणारा विलंब यामुळे समांतर जलवाहिनीचे रखडलेले कामकाज याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे सोलापूर शहरवासियात पसरलेला असंतोष, यामुळे समांतर जलवाहिनीच्या कामाला गती देणेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **(सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ व मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

**डॉ.सुधीर तांबे,** सर्वश्री जयंत आसगावकर, अभिजित वंजारी, डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री राजेश राठोड, अमरनाथ राजूरकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानातील आश्रमशाळांना गेल्या दोन वर्षांपासून शासनाच्या आदिवासी व वित्त विभागांकडून विद्यार्थ्यांच्या भोजनापोटी देय परिरक्षण मिळण्यास वारंवार होणारी दिरंगाई व अडवणूक, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर सोयी सवलतीवर होणारे परिणाम, त्यामुळे शासनाबाबत निर्माण झालेला असंतोष, नाशिक संच अप्पर आयुक्त क्षेत्रातील आश्रमशाळांचे गेल्या दोन वर्षांपासून परिरक्षण अनुदान निर्धारण करण्यास झालेली दिरंगाई, त्यामुळे परिपोषण अनुदान मिळण्यास येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाची उपाययोजना, आश्रमशाळा संहितेप्रमाणे मान्यतेबाबत शासनाने निर्णय न घेणे, आदिवासी आश्रमशाळांच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेत गणित/भौतिकशास्त्र या विषयासाठीच्या एका पदास मंत्रीमंडळाच्या मान्यतेचे शासनाचे आदेश निघालेले असताना ते पद भरण्यास मान्यता न दिल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना फक्त एकाच म्हणजे मेडिकल किंवा इंजिनियरींगला जाता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, महागाईच्या काळात पहारेकरी पदास २४ तासासाठी फक्त दरमहा फक्त ५००० हे तुटपुंजे मानधन मिळत असल्यामुळे कोणीही व्यक्ती या पदावर काम करण्यास तयार नसणे, मानधन वाढविण्याबाबत आदिवासी विभागाने कोणताही निर्णय न घेणे, कोरोना काळात आश्रमशाळांमधील मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या रिक्त जागावर व सेवानिवृत्तीमुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रिक्त झालेली पदे न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, ही पदे तात्काळ भरण्यास मान्यता देण्याबाबत निर्णय अपेक्षित असणे, आश्रमशाळांतील लहान मुलांसाठी सफाईदाराचे पद नसल्यामुळे मुलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता मानधन तत्वावर महिला व

अप्रकाशित प्रत

पुरुष सफाईदार पदास तात्काळ मान्यता मिळण्याची आवश्यकता, विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता व आरोग्याच्या दृष्टीने सहाय्यक अधिक्षक व सहायक अधिक्षिका हे पद भरतीस प्राधान्याने मान्यता मिळण्याची आवश्यकता इ. अनेक मागण्यांवर वारंवार शासनाकडे निवेदने दिली असता त्याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**(मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३) ते (७)] —**

**(३)** **श्री.किशोर दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सन २०१८ ते सन २०२० या कालावधीत सरकारकडून ३३ कोटी व १३ कोटी वृक्ष लागवड योजना हाती घेण्यात आलेली असणे, या योजनेअंतर्गत पंढरपूर तालुक्यातील सिद्धेवाडी, गादेगाव, भंडीशेगाव, करकंब, धोंडेवाडी, गादेगाव कासेगाव, कोसेवाडी, नेमतवाडी, गोपाळपूर, एकलासपूर, सुस्ते, फुलचिंचोली, पंढरपूर, खर्डी, पटवर्धन कुरोली, भाळवणी या गावांमध्ये वृक्ष लागवड करण्यात आलेली असणे, ही वृक्ष लागवड करत असताना संबंधित वनक्षेत्रपाल व कायम वनमजूर या दोघांकडून मोठ्या प्रमाणात हेराफेरी करण्यात आल्याच्या व या वृक्ष लागवडीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या तसेच तक्रारी शासनापर्यंत सादर झालेले असणे, सदर प्रकार घडलेल्या गावांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी लोकांना वन खात्यात कायम कर्मचारी म्हणून घेतो या अमिषाने लोकांच्या नातेवाईकाच्या नावे मोठ्या रकमेचे चेक काढून व त्या रक्कमा परत फोन पे, गुगल पे च्या माध्यमातून स्वतःकडे घेतलेल्या असणे, वृक्ष लागवड करत असताना ज्या वन मजुरांच्या नावे चेक काढले आहेत त्या वन मजुरांनीही शासनाकडे तक्रारी केलेल्या असणे, जे मजूर कधीही कामावर आले नाहीत अशाही वन मजुरांच्या नावे या अधिकाऱ्यांनी बोगस चेक काढून लाख रुपयांचा अपहार केलेला असणे, कॉलेज विद्यार्थी, विशेष म्हणजे ज्या व्यक्तीला दोन्ही हात नाहीत अशा व्यक्तींच्या नावेही बोगस चेक काढलेले असणे, घडलेल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विभागीय वन अधिकारी सोलापूर यांच्याकडे तक्रार केली असता संबंधितावर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप तत्कालीन वनाधिकारी यांनी फेटाळून लावून त्यांना निर्दोष मुक्त केलेले असणे, पंढरपूर तालुक्यात सन २०१८ ते सन २०२० या कालावधीत तालुका वनरक्षक व त्याच्या इतर साथीदारांनी शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या रकमेचा अपहार केलेला असणे, या कृत्यांसाठी संबंधित अधिकाऱ्याला बडतर्फ करण्याऐवजी त्याची बदली गारगोटी कोल्हापूर येथे केलेली असणे, या सर्व बाबींचा विचार करून संबंधित

अमुद्रित प्रत

अधिकारी व याप्रकरणी सामील अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन १९७९ ला रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून टेंभापूरी मध्यम प्रकल्प उभारणीसाठी दिनांक २३ मार्च, १९७९ रोजी ३२०.०० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली असून सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ०७ सप्टेंबर, १९९४ रोजी १७३०.०० लक्ष रुपयांची दिली असणे, सदर मध्यम प्रकल्पाचे काम सन १९७९ मध्ये सुरु होऊन सन १९९५ मध्ये पूर्ण झाले असणे, टेंभापूरी मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता २१.२७ द.ल.घ.मी असणे, सन २००६ पासून धरणात काही प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध होत असणे, परंतु पुरेशा पावसाअभावी धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा उपलब्ध झाला नसणे, सदर प्रकल्पात बाधित गावाची संख्या ९ असून बाधित क्षेत्र ७८५ हेक्टर असणे, तर बाधित शेतकऱ्यांची संख्या ४०० असणे, शिवाय २५ टक्के धरणग्रस्तांना अद्याप रहिवाशी प्लॉट मिळाला नसणे, पुनर्वसित गावात अद्याप सोयी सुविधा नसणे, लाभक्षेत्राच्या गावाची संख्या २३ असून ४७९ हे सिंचन क्षेत्र प्रस्तावित असणे, सदर धरणावर २५ गावांच्या पाणी पुरवठा योजना असणे, धरण पूर्ण क्षमतेने भरत नसल्याने, २५ गावांना पिण्यासाठी पाणी व सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसणे, कॅनॉल खराब झाले असल्याने उपचाऱ्यांना पाणी उपलब्ध होत नसणे, टेंभापूरी मध्यम प्रकल्पात पाणीसाठा उपलब्ध करुन देण्यासाठी उपाय योजना करणेस्तव शासनाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांना दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी कार्यवाही करण्यास सूचित केले असणे, परंतू त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसणे, कायगांव, येथून गोदावरीतील बॅक वॉटर मधून पाणी लिफ्ट करुन सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे मध्यम प्रकल्पात पाणी आणल्यास धरण पूर्ण क्षमतेने भरुन सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत होणार असणे, धरणग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप पर्यायी जमीन व धरणग्रस्त प्रमाणपत्र मिळाले नसणे, या बाबतीत शासनाने गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळास दिनांक २७ जुलै, २०२० रोजी पत्र देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, परंतू त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसणे, धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ठिकाणाहून पाणी लिफ्ट करणे, धरणग्रस्तांना पर्यायी जमिन देणे, रहिवाशी प्लॉट देणे व धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

(५) **सर्वश्री बाळाराम पाटील,** जयंत पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगर विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पनवेल महानगरपालिका प्रशासनाने वृत्तपत्रात जाहिरातीत दिलेल्या माहितीनुसार नागरिकांना दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंतच्या मुदतीत कर भरण्याचे आव्हान केलेले असणे, दिनांक १ एप्रिल २०२२ पासून २ टक्के दरमहा शास्ती कर आकारून व्याज घेणार असल्याचे नमूद केलेले असणे, पनवेल महानगरपालिकेने दिनांक १२ मे, २०२१ रोजी कार्यालय जा. क्र. ३१२१ / प्र.क्र. १/१५५५/२१ सुधारित आदेश पान क्र. ५/६ वर च्या दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत सदर कालावधीमध्ये कोणतीही शास्ती /दंड / व्याज आकारण्यात येऊ नये असे आदेश तत्कालीन आयुक्त यांनी काढलेले असणे, त्यानंतर नवनियुक्त आयुक्त यांनी पदग्रहण केल्यानंतर शुध्दीपत्रकाद्वारे सदर मुदत ही कमी करून दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत करणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराबाबत नागरीकांच्या मनात प्रचंड रोष असणे, मुळातच लावलेला कर हा इतर महानगरपालिकांच्या तुलनेत खूप जास्त असणे, सदर बाबतीत कर कमी करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करत असताना अनेक बैठका मंत्री महोदयांबरोबर झालेल्या असणे, पनवेलवासियांना मार्च अखेर पर्यंत मालमत्ता कराबाबत ठोस निर्णय देण्याचे आश्वासित असणे, निर्णय होईपर्यंत पनवेलच्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी सद्यपरिस्थितीत शास्ती न लावण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंतची मुदतवाढ देण्यासंबधित नागरिकांद्वारे विविध आंदोलनांद्वारे मागणी होत असणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता कर धारकांना कोणतीही शास्ती / दंड / व्याज आकारणी करण्यात येऊ नये, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.राजेश राठोड**, कपिल पाटील, सतिश चव्हाण, विक्रम काळे, डॉ मनिषा कायंदे, श्री.अनिकेत तटकरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासन निर्णयानुसार एम. फील. पात्र अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती व वेतन वाढीचे लाभ देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे व मा.उच्च न्यायालयाचे ४८ प्रकरणांचे निकाल असताना शासनाने सदर अध्यापकांविरुध्द अन्यायकारक धोरण अवलंबिले असल्याने, तत्कालीन अवर सचिव यांनी दिनांक २७ जानेवारी, २०२१ ला व सहसंचालक, कोकण विभाग यांनी दिनांक २१ जानेवारी, २०२२ ला निर्गमित केलेले परिपत्रक न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणारे असल्यामुळे तात्काळ स्थगित करावे अशी एम.फील. अध्यापकांनी केलेली मागणी, याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयाच्या निकालाच्या (माधुरी देशमुख) प्रकरणातील मा.सर्वोच्च

अप्रकाशित प्रत

न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारावर एम. फील. या अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती, (CAS) तसेच वेतन वाढीचे लाभ देण्याबाबतचे धोरण घोषित करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी, मा.मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना देण्यात आलेले निवेदन, परंतु अद्यापही सदरील निवदेनावर कोणतीही कार्यवाही होत नसल्याने एम.फील. अध्यापकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, त्यामुळे राज्य शासनाने एम.फील. पात्र अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती तसेच वेतन वाढीचे लाभ देण्याबाबत, तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(७) **डॉ.मनिषा कायंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या "प्रज्ज्वला" योजनेमध्ये निधीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आलेले असणे, "प्रज्ज्वला" योजनेतंर्गत राज्य महिला आयोगाद्वारे राज्यातील महिला बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्याकरिता महिला आयोगाच्या नियमित कार्यक्रम निधीचा वापर केला जात असणे, प्रज्ज्वला योजनेतील कामांकरिता निधी वापरण्याबाबत शासन निर्णय किंवा सदर योजनेचा समावेश नसतांनाही तसेच महिला आयोगाच्या कार्यकक्षेत नसतानाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी प्रज्ज्वला योजनेअंतर्गत राज्यातील महिला बचत गटांना प्रशिक्षण दिल्याचे उघडकीस आलेले असणे, राज्यातील महिला बचत गटांना राज्य शासनाचे महिला आर्थिक विकास महामंडळ निधी /आर्थिक मदत करत असतानाही "प्रज्ज्वला" योजनेतील निधी खर्च करण्यात आला असणे, सदरहू निधी खर्च करण्याबाबतचा शासन निर्णय पारित करण्यात आला आहे का तसेच प्रज्ज्वला योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखा शाखेकडून पारित करण्यात आले आहे का, आदिबाबत सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे असणे महिला आयोगाने निधीचा वापर केल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द तात्काळ कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

(८) **सर्वश्री प्रविण दरेकर,** कपिल पाटील, अमोल मिटकरी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक येथील विकासकांकडून सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत भूमि-अभिन्यास व इमारत नकाशे विकसित करतांना द्यावयाचे २० टक्के भूखंड/सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गट प्रवर्गासाठी

अप्रकाशित प्रत

उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना आतापर्यंत सुमारे ७००० सदनिका व २०० भूखंड म्हाडाकडे हस्तांतरित केलेले नसल्याची धक्कादायक माहिती दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी उघडकीस आलेली असणे, सदर योजनेअंतर्गत हजारो सदनिका आणि शेकडो भूखंड विकासकांकडून शासनाकडे हस्तांतरीत होणे अपेक्षित असताना या सर्व मालमत्तांची परस्पर विक्री करून सुमारे ७०० कोटी रुपयांचे शासनाचे नुकसान करण्यात आलेले असणे, त्याचबरोबर हजारो कुटूंबांना त्यांच्या हक्काच्या सदनिका/जमिनीपासून वंचित रहावे लागलेले असणे, महापालिका हद्दीत ४००० चौ.मी. वरील जागेवर मंजूर भूमि-अभिन्यास व इमारत नकाशे यांचा सविस्तर तपशिल महापालिका प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, नकाशा मंजूरी पत्रात संबंधित अट नमूद करुनही जमीनमालक, विकासक यांचेकडून भूखंड व सदनिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसणे, अशा सदनिका उपलब्ध न करताच आराखडयातील ऊर्वरीत ८० टक्के सदनिकांना अंशत: किंवा संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करणे, मंजूरी पत्रातील अटींचे अनुपालन झालेले नसणे, नियमांचे उल्लंघन करून परवानग्या देणाऱ्या व प्राप्त करणाऱ्या अधिकारी/कर्मऱ्यांबरोबरच सुमारे १००० कोटी रुपये हडपणाऱ्या विकासावर कोणतीही कारवाई केलेली नसणे, गोरगरिबांची घरे लुटून विकासकांनी नफेखोरी केलेली असणे, अत्यल्प/अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका/भूखंड उपलब्ध न झाल्याने मंजूर अभिन्यास रद्द करून सदनिका व भूखंड शासनाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यास महापालिका प्रशासनाकडून चालढकल केली जात असणे, म्हाडा प्रशासनाने अनेकदा मागणी करुनही नाशिक महापालिका प्रशासनाकडून सदरच्या सदनिका/ भूखंड म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या नसणे, महापालिका अधिकारी/कर्मचारी, विकासक व सर्व सबंधितांच्या संगनमताने झालेल्या हजारो कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मा. मुख्यमंत्री, मा. गृहनिर्माण मंत्री तसेच आयुक्त, नाशिक महापालिका यांचेकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यात होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होते असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला

अप्रकाशित प्रत

तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, संबंधित विकासकांनी प्रशासनाच्या संगनमताने केलेल्या हजारो कोटी रुपयांच्या गैरव्यवहारासंदर्भात कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली जात असणे, त्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, सदरच्या सदनिका त्वरेने उपलब्ध झाल्यास म्हाडाच्या माध्यमातून दुर्बल घटकांना हक्काची घरे मिळणार असणे, सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत मिळणाऱ्या हक्काच्या घरांपासून नाशिक महापालिका परिसरातील नागरिकांना वंचित रहावे लागले असल्याने त्यांचेमध्ये अन्याय तथा संतापाचे वातावरण पसरलेले असणे, याबाबत अधिवेशन काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, याकडे प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.विनायक मेटे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बीड नगरपालिका हद्दीतील नागरिकांना पिण्याचे पाणी १५-१५ दिवसांनी मिळणे, माजलगाव बॅकवॉटर व बिंधुसरा धरणांमधून बीड शहराकरिता येणारे पाणी गढूळ आणि पिण्यायोग्य नसणे, फिल्टर प्लांटची अत्यंत वाईट अवस्था झालेली असणे, ब्लिचिंग पावडर पूर्ण विरघळत नसणे, शुध्दीकरण व्यवस्थित न केल्यामुळे नागरीकांच्या आरोग्याशी नगरपालिकेने खेळ करणे, त्याबाबत कोणतीही काळजी न घेणे, याचबरोबर बीड नगरपालिका हद्दीमध्ये अनेक वसाहतींमध्ये वीज नसणे, वेळेवर वीज न मिळणे, अनेक ठिकाणी बेकायदेशीर कनेक्शन्स निदर्शनास येणे, पथदिवे महिनो महिने बंद असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात चोऱ्यांचे प्रमाण व अवैध धंद्यांचे, गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असणे, याबाबत नगरपालिकेने व महावितरण कंपनीने पूर्ण दुर्लक्ष करणे, बीड नगरपालिकेने कोरोना काळातील मयतांच्या अंत्यविधीमध्ये मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार करणे, त्यामध्ये अधिकारी-पदाधिकारी सामील असणे, नगररचनाकार व ट्रेसर्स यांनी अवैध बांधकामांना भ्रष्टाचार करून मोठ्या प्रमाणात अभय देणे, पैसे घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम परवान्याचे काम न करणे, बीड शहरातील मुख्य रस्त्याच्या कामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार करून निविदेनुसार गुणवत्तेची कामे न करणे, अनेक रस्त्यांची योग्य कामे न झाल्यामुळे मोठ्याप्रमाणात धुळीची वादळे तयार होऊन सर्व दुकानदार, नागरिक यांना मोठ्या प्रमाणात त्रास होणे, धुळीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होणे, डोकेदुखी, कॅन्सरचे प्रमाण वाढणे, त्यामुळे नागरिकांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागणे, या सर्व बाबींकडे नगरपालिकेचे

अग्रिम प्रत

होणारे दुर्लक्ष, नगरपालिकेने अनेक योजनांची अंमलबजावणी न करणे, त्यामुळे नागरीक सुविधांपासून व योजनांपासून वंचित राहणे, या सर्वांबाबत नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी दुर्लक्ष करणे, त्यांचे कार्यालयात सतत गैरहजर राहणे, DPDC बैठकीमध्ये त्यांच्या गैरकृत्यांबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याचा घेतलेला निर्णय, जिल्हाधिकारी यांनी त्यांना अनेक वेळा ताकीद देऊनही त्यांच्या वर्तणुकीमध्ये सुधारणा न होणे, त्यांनी भ्रष्टाचारामध्ये सतत कार्यरत राहून काम करणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयक —**

**पुर:स्थापनार्थ — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १ — निकमार विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२"

---

**आठ : (मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री शशिकांत शिंदे,** दिवाकर रावते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विक्रम काळे, रविंद्र फाटक, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री विप्लव बाजोरिया, मोहनराव कदम, अनिकेत तटकरे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अभिजित वंजारी, संजय दौंड, अंबादास दानवे, जयंत आसगावकर, दुष्यंत चतुर्वेदी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील अस्तित्वात असलेल्या व दुरवस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ च्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ या योजनेची टप्प्याटप्प्यात अंमलबजावणी करण्यात आली असणे, प्रथम टप्प्यात रस्ते दर्जोन्नतीसाठी १० हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणार असून त्यापैकी सन २०२१-२२ या वर्षात ३ हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात आले. या प्रकल्पाची एकूण किंमत ७ हजार ५०० कोटी रुपये असणे, सन २०२२-२३

अप्रकाशित प्रत

मध्ये ३ हजार कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून रस्त्याच्या कामात निधी कमी पडल्यास नाबार्ड बँक आशियाई विकास बँक वा तत्सम संस्थेकडून कर्जरुपी निधी उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय सुध्दा शासनाने घेतलेला असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ मध्ये बऱ्याच त्रुटी आहेत. त्या दूर करण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण ६ हजार ५५० किलोमीटर रस्त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात २९२५ किलोमीटर बांधकामाला मान्यता प्राप्त झाली असून २०१७७ कोटी रुपये खर्च होणार असणे, ग्रामीण भागातील कोरोनामुक्तीच्या कामाला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्यातील प्रत्येक महसूली विभागात पहिल्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख, २५ लाख व १५ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचा शासनाने चांगला निर्णय घेतलेला असणे, राज्यात ५ लाख ४२ हजार ९४४ महिला स्वयंसहाय्यता गट कार्यरत असून ५५ लाख ३५ हजार ४३२ कुटूंबांचा त्यात समावेश करण्यात आला असून ११ हजार १४० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आलेले असणे, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत १० हजार २३१ गटांना २६ कोटी रुपये बीजभांडवल वाटप करण्यात आलेले असणे, ग्रामीण भागातील घरकूलांच्या निर्मितीला गती देण्यासाठी ग्रामीण महाआवास अभियानाचा शासनाने प्रारंभ केला असून आतापर्यंत ४ लाख २५ हजार घरकुले पुर्ण करण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून ५,३९,५२,२६८ इतके मनुष्यबळ निर्मिती करण्यात आली. स्वच्छ भारत मिशनमधून ८ लाख ७८ हजार ७११ शौचालये बांधण्यात आली. प्रधानमंत्री उज्वला योजनेतून ५ लाख ७५ हजार १८३ महिलांना गॅस जोडणी करण्यात आलेली असणे, सौभाग्य योजनेतून ५ लाख ७८ हजार १५१ विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या असणे, अनुसूचित जमातींचे बनावट जात वैधता प्रमाणपत्रे सादर करुन इतर जातीच्या उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविली असणे, ज्यांनी अशी बनावट जातप्रमाणपत्रे दिली आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक असणे, आदिवासी शालेय विद्यार्थीनींना शालेय भत्ता गेल्या २० वर्षापासून प्रत्येक दिवशी १ रुपया देण्यात येतो यात वाढ करुन आदिवासी विद्यार्थीनीना कमीतकमी १० रुपये शालेय भत्ता देण्यात यावा. मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ राज्यात सुरु करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला असणे, ऑलिम्पिकसाठी राज्यातील निवड झालेल्या १० खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी रु. ५ कोटी इतकी आर्थिक सहाय्य करणारे देशातील महाराष्ट्र एकमेव राज्य असून नवीन व्यायाम शाळेच्या बांधकामाची मर्यादा ७ लक्ष रुपयावरुन १२ लक्ष इतकी करण्याची आवश्यकता, नवीन व्यायाम शाळांच्या साहित्य खरेदीसाठी जास्त निधीची तरतूद करण्यात यावी. डीपीसी

अप्रकाशित प्रत

योजनेअंतर्गत क्रिडांगण विकास योजनेला व्यापक स्वरुप देऊन तरतूद ७ लक्ष रुपयावरुन १० लक्ष करण्यात यावे त्यात रनिंग ट्रॅक, जॉगिंग ट्रॅक विकसित करावे जेणे करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस भरती व इतर मैदानी खेळासाठी चालना मिळेल, विदेशी गायींच्या जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय होलस्टीन फ्रिजीयन ( एका वेतात सरासरी ९ ते १२ हजार लिटर) ही आहे. तसेच भारतीय जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय साहीवाल (एका वेतात सरासरी ४ ते ६ हजार लिटर) ही आहे. महाराष्ट्र राज्यातील जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय देवणी (एका वेतात १ ते दीड हजार लिटर) ही आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय सध्या पुणे येथील भाग्यलक्ष्मी फार्म, येथे असून भारतीय वातावरणात ही गाय एका वेतात ११,५०० लिटर दूध देत आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय राज्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

**नऊ : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

(१) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्रात असलेल्या सुमारे १०,००० गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण आयोजक आणि संस्थांकडून सुरक्षिततेच्यादृष्टीने उपक्रम राबविले जात नसल्यामुळे, गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण करताना प्राणघातक अपघात होणे, गत तीन दशकात गिरीभ्रमण, गिर्यारोहण आणि इतर साहसी उपक्रमांमध्ये सहभाग घेणा-यांच्या संख्येत वाढ होत असणे, परंतु अनुभव, योग्य साधनसामुग्री, कुशल संघटन आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे बहुतेक उपक्रमात गांभीर्याने लक्ष दिले जात नसणे, अतिरंजित जाहिरातींना बळी पडून अननुभवी, उत्साही पर्यटक आकर्षित होणे, सहभागी आणि आयोजक यांच्याकडून सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याने अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्याकरिता उपक्रमांसाठी कठोर नियमन व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असणे, महाराष्ट्रात साहसी उपक्रमातील प्रशिक्षण, तसेच प्रथमोपचार शिक्षणासाठी अनुदानासह उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची अदयाप अंमलबजावणी झालेली नसणे, गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण आणि इतर साहसी उपक्रमांत सहभाग घेणा-या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने कार्यवाही होण्याकरिता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

(२) **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** सदाशिव खोत, महादेव जानकर, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मौजे शेरेवाडी (आवळाई), (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील श्रीराम स्टोन क्रशर यांचेकडून अवैधरित्या दगड व मुरुमाचे उत्खनन होत असणे, उत्खननाकरीता पर्यावरण व प्रदूषण विभागाची तसेच, भूजल विज्ञान विभागाची परवानगी घेण्यात आली नसणे, सदर खाणपट्टा मंजूर करतांना नियम व अटींची पूर्तता करण्यात आली नसल्याने हा खाणपट्टा अनधिकृत असणे, खाणपट्ट्याच्या शेजारील पिण्याचा पाण्याच्या तलावामध्ये मोठया प्रमाणात उत्खनन केले असणे, त्यामुळे तलावाचे जलप्रदूषण होऊन पाण्याचा स्त्रोत संपण्याची शक्यता निर्माण झाली असणे, साधारणः ३ कि.मी. पर्यंत मोठ्या प्रमाणात धूळ वातावरणात पसरल्यामुळे २०० हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांचे नुकसान झालेले असणे, तसेच परवाना व पासिंग नसलेली ट्रॅक्टर, जेसीबी व लोडिंगची वाहने इत्यादींच्या सहाय्याने अवैधरित्या उत्खनन केलेला दगड व मुरुम ट्रक व टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त भरणे, ओव्हरलोड गाड्यांमुळे रस्त्यावरील वाहतुकीला व नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत असणे, दगड व मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन व प्रदूषण करणाऱ्या श्रीराम स्टोन क्रशर यांचेवर कारवाई करण्याबाबत शेरेवाडी ग्रामस्थांनी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी तक्रार केली असणे, तक्रार करुनही दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, त्यामुळे सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १५ मार्च, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद